# लवाद, नगर रचना परीयोजना नैना क्र.१२

**(वाकडी, उमरोली, चिंचवली तर्फे वाजे, उसर्ली (बुद्रुक), रिटघर, मोरबे, कोंडळे, महालुंगी या गावांच्या काही भागात)**

नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई – ४००६१४

---

**(महाराष्ट्र नगर रचना परियोजना नियम १९७४, नियम १३ अन्वये)**

क्र.लवाद/न.र.यो-१२/सुनावणी/२०२५/२४ दि. २१/०४/२०२५

## जाहीर सूचना

शहर व औदयोगिक विकास महामंडळ, मर्यादित, (सिडको) यांनी विशेष प्राधिकरण म्हणून तयार केलेल्या व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ६८(२) प्रमाणे मंजूर केलेल्या प्रारुप नगर रचना परियोजना ,नैना क्र. १२ (वाकडी, उमरोली, चिंचवली तर्फे वाजे, उसर्ली (बुद्रुक) रिटघर,मोरबे, कोंडळे, महालुंगी) चे लवादीय कामकाज कलम ७२(४) प्रमाणे सुरु आहे. या संदर्भात महाराष्ट्र नगर रचना नियम १९७४ च्या नियम क्र. १३(३) प्रमाणे विहित नमुना ४ मध्ये विशेष सूचना परीयोजनेतील प्रत्येक भूखंड धारकाला पोस्टाने पाठविलेली आहे. परंतु अपुरे किंवा बदललेले पत्ते किंवा अन्य कारणांमुळे उक्त विशेष सूचना काही भूखंड धारकांना मिळालेली नाही असे निदर्शनास आले आहे. त्यामुळे काही भूखंड धारक सुनावणीसाठी उपस्थित राहिलेले नसावेत असे निदर्शनास येते. अशा भूखंड धारकांना सुनावणीची पुन्हा संधी प्राप्त करुन देणे आवश्यक आहे.

तरी ज्या भूखंडधारकांना अदयाप नमुना ४ मधील लवादांची सूचना मिळालेली नाही अशा भूखंड धारकांना ही जाहीर सूचना देणेत येत आहे की त्यांनी सुनावणी देणेसाठी नमूद केलेल्या दिनांकाला व दिलेल्या वेळेत मा. लवाद यांचे कार्यालयात ७/१२ चा उतारा व अन्य आवश्यक त्या कागदपत्रांसह तसेच आधारकार्डासह उपस्थित राहावे. जे भूखंडधारक या दिनांकाला उपस्थित राहून सुनावणी देणार नाहीत त्यांना परियोजनेतील त्यांच्या अंतिम भूखंडाबाबत काही म्हणावयाचे नाही असे गृहीत धरुन उक्त परियोजनेला अंतिम स्वरुप देणेत येईल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | गावाचे नाव | सुनावणीसाठी दिलेला दिनांक/वेळ | |
|---|---|---|---|
| १. | उसर्ली व रिटघर गावातील भूखंड धारक | दि. २९ एप्रिल २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| २. | महालुंगी व कोंडले गावातील भूखंड धारक | दि. ३० एप्रिल २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| ३. | उमरोली गावातील भूखंड धारक | दि. ०५ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| | | दि. ०६ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| ४. | चिंचवली तर्फे वाजे गावातील भूखंड धारक | दि. ०७ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| | | दि. ०८ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| | | दि. १४ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| | | दि. १५ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| ५. | वाकडी गावातील भूखंड धारक | दि. ०९ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| ६. | मोर्बे गावातील भूखंड धारक | दि. १६ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| | | दि. १७ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| | | दि. १९ मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |
| | | दि.२० मे २०२५ | ११.३० ते १२.३० व २.०० ते ४.०० |

**(सु. व. सुर्वे)**
**लवाद,**
**नगर रचना परियोजना,नैना क्र. १२**